**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**घ.क.व्य - कार्यकारी अभियंता (परिवहन)शहर**

**दुसरा मजला, वरळी यानगृह इमारत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई – ४०००१८.**

**क्र. काअ/परि/श/१४७६०/घकव्य दिनांक :१८.०२.२०२५**

## सूचना / परिपत्रक

**'वाहनचालक'या पदासाठी केवळ बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कामगार व तत्सम (समान) वेतनश्रेणीतील कर्मचा-यांमधून अर्ज मागवून उमेदवारांची निवड करण्याबाबत.**

१.कार्यकारी अभियंता (परिवहन) शहर/पश्चिम उपनगरे/पूर्व उपनगरे या तिन्ही कार्यालयाच्या आस्थापनेवरील **'वाहनचालक'** संवर्गातील रिक्त पदे निवडीने भरण्याकरीता केवळ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व खाते/विभागातील कामगार व तत्सम (समान) वेतनश्रेणीतील पात्र व इच्छुक कर्मचा-यांकडून सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात 'वाहनचालक' M-12 (रु.20700-65800) या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. परिपत्रक क्र.एमपीएम/०२/२२०३ दि. १८.०४.२०२३ अन्वये वाहनचालक हा संवर्ग 'ड' गटात मोडतो.

२.अर्जदारांनी आपले अर्ज मराठीत सुवाच्य स्वहस्ताक्षरांत लिहून खाते/ विभाग प्रमुखांमार्फत व सेवा अभिलेखाद्वारे अर्जातील माहिती पडताळून आवक-जावक क्रमांकासह कार्यकारी अभियंता(परिवहन) शहर यांच्या कार्यालयात दिनांक २४.०२.२०२५ पासून दिनांक १९.०३.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील याची खबरदारी घ्यावी. सदर कालावधीपूर्वी वा नंतर प्राप्त झालेले अर्ज तसेच कुरीयर, स्पीड पोस्ट व टपालाने पाठविलेले अर्ज, अपूर्ण अर्ज, उमेदवारांनी सही न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

३.पदाचा तपशील .:-

१.पदाचे नाव :- **'वाहन चालक'**

२.वेतनश्रेणी (सुधारीत):- स्तर-( M-12) -(रु.20700-65800)

३.तिन्ही विभागामध्ये एकूण भरावयाच्या रिक्त पदांची संख्या:- 389+206+128=723

**कप्पीकृत आरक्षण पुढीलप्रमाणे आहे.**

**३.अ) कार्यकारी अभियंता(परिवहन) शहर विभागाचा आरक्षण तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 20 | 10 | 7 | - | 1 | 2 | 1 | 49 | 27 | 27 | 127 | 271 |
| 30% महिलांकरिता | 9 | 5 | 3 | - | - | 1 | - | 21 | 12 | 12 | 55 | 118 |
| एकूण | 29 | 15 | 10 | - | 01 | 03 | 01 | 70 | 39 | 39 | 182 | 389 |
| 4% दिव्यांगाकरिता | परिपत्रक क्र. एमबीसी/4270 दि. 11.07.2019 नुसार 16 पदे आरक्षित असून दिव्यांग आरक्षणातून सूट मिळण्याबाबतचा प्रस्ताव कार्यान्वित आहे. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण गटातील 16 पदे रिक्त ठेवण्यात येतील. | | | | | | | | | | | |

३.ब) कार्यकारी अभियंता(परिवहन) पूर्व उपनगरे विभागाचा आरक्षण तपशील खालीलप्रमाणे आहे.

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 15 | 1 | 1 | - | - | - | 1 | 16 | 9 | 9 | 38 | 90 |
| 30% महिलांकरिता | 6 | 1 | - | - | - | - | - | 7 | 4 | 4 | 16 | 38 |
| एकूण | 21 | 02 | 01 | - | - | - | 01 | 23 | 13 | 13 | 54 | 128 |
| 4% दिव्यांगाकरिता | परिपत्रक क्र. एमबीसी/4270 दि. 11.07.2019 नुसार 05 पदे आरक्षित असून दिव्यांग आरक्षणातून सूट मिळण्याबाबतचा प्रस्ताव कार्यान्वित आहे. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण गटातील 05 पदे रिक्त ठेवण्यात येतील. | | | | | | | | | | | |

३.क) कार्यकारी अभियंता(परिवहन) पश्चिम उपनगरे विभागाचा आरक्षण तपशील खालीलप्रमाणे आहे.

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 18 | 5 | 4 | - | 1 | 1 | 1 | 28 | 15 | 15 | 56 | 144 |
| 30% महिलांकरिता | 8 | 2 | 2 | - | - | 1 | 1 | 12 | 6 | 6 | 24 | 62 |
| एकूण | 26 | 07 | 6 | - | 01 | 02 | 02 | 40 | 21 | 21 | 80 | 206 |
| 4% दिव्यांगाकरिता | परिपत्रक क्र. एमबीसी/4270 दि. 11.07.2019 नुसार 08 पदे आरक्षित असून दिव्यांग आरक्षणातून सूट मिळण्याबाबतचा प्रस्ताव कार्यान्वित आहे. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण गटातील 08 पदे रिक्त ठेवण्यात येतील. | | | | | | | | | | | |

४.अ) **"वाहनचालक" संवर्गाची अर्हता :**

**"वाहनचालक" ब**-निवडीने मंजूरी क्र.एमपीएम/३/२७४९ दि.२४.०५.२०१९

| अर्हता– 'ब-निवडीने'मनपातील सर्व खात्याच्या आस्थापनेवरील संबंधित कामगार व तत्सम (समान) वेतनश्रेणीतील कार्यरत कर्मचा-यांमधून परिपत्रकाव्दारे अर्ज मागवून आणि खालीलप्रमाणे अर्हता धारण करणा-या उमेदवारांमधून सेवाज्येष्ठतेने. | |
|---|---|
| 1 | उमेदवाराची नियुक्ती दि.३१.१२.२००५ पूर्वी नियुक्त झालेला असल्यास ७ वी उत्तीर्ण असावा आणि दि.३१.१२.२००५ नंतर नियुक्त झाला असल्यास ९ वी उत्तीर्ण असावा. |
| 2 | उमेदवाराची महापालिकेत कामगार किंवा तत्सम पदावर ३ वर्षे सेवा झालेली असावी. |
| 3 | उमेदवाराजवळ प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा (आर.टी.ओ.) जडवाहन चालविण्याचा सूचना परिपत्रकाच्या दिनांका पुर्वीचा किमान एक वर्षापूर्वीचा वैध परवाना असणे आवश्यक आहे. |
| 4 | उमेदवारास मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. |
| 5 | उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| 6 | उमेदवार वैद्यकीय तपासणीत पात्र ठरणे आवश्यक आहे. |

४.ब) **निवडीचे निकष -**

वाहनचालक संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता पुढीलप्रमाणे निवडीचे निकष लागू राहातील.

उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणीत उत्तीर्ण झालेल्या परिपत्रक क्र.एमपीएम/०३/२७८१ दि. ७.४.२०१० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार आपापसातील सेवाजेष्ठतेनुसार निवड यादी तयार करणे व आपापसातील सेवाजेष्ठता ठरविताना त्यांच्या सेवाप्रवेशाच्या पदावरील सेवाजेष्ठतेचा विचार करणे आवश्यक राहील.

व्यवसाय चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची सेवाज्येष्ठतेनुसार निवड यादी तयार करताना दोन किंवा अधिक उमेदवारांचा सेवाप्रवेश पदावरील नियुक्ती दिनांक समान असल्यास पुढील निकष लागू राहतील.
अ) जन्मदिनांकानुसार वयोज्येष्ठ उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.
ब) उपरोक्त 'अ' प्रमाणे समान असल्यास उमेदवाराच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल.

उमेदवार वैद्यकीय तपासणीत पात्र ठरणे आवश्यक आहे, अन्यथा वाहनचालक पदासाठी विचारात घेतले जाणार नाही.

कार्यकारी अभियंता(परिवहन)शहर, पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे विभागातील सामाजिक व समांतर आरक्षणानुसार दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदांकरिता एकत्रितरीत्या अर्ज मागवून एकत्रित सामाईक गुणवत्ता यादी(सेवाज्येष्ठता यादी) तयार करुन रिक्त पदांएवढीच एकत्रित अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल. सदर एकत्रित निवड यादीतील पात्र उमेदवारांची त्या त्या विभागातील सामाजिक व समांतर आरक्षणानिहाय नियुक्ती करण्यात येईल.

५. दिव्यांगासाठी ४% परिपत्रक क्र.एमबीसी /४२७० दि. ११.०७.२०१९ संलग्नित शासन निर्णय तसेच दि.१२.११.२०२० व दि. ०२.०२.२०२१ च्या शासन निर्देशानुसार आरक्षणातून सूट मिळण्याबाबतचा प्रस्ताव कार्यान्वित आहे. त्यामुळे तिन्ही विभागामधील खुला प्रवर्गातील सर्वसाधारण गटातील 29 पदे रिक्त ठेवण्यात येतील.

६.आरक्षण/अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे.

७. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गातील विहीत आरक्षण त्या त्या प्रवर्गातील कर्मचारी उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.

८.अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सत्यता पडताळणी बाबत महाराष्ट्र शासन इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र. संक्रीर्ण-२०२१/प्रक्र. २९७/ मावक दि.२६.४.२०२२ मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवाराच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित उमेदवारांच्या आरक्षित असलेल्या नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद लागू राहतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्गीय उमेदवारांनी त्या त्या जातीचे जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. जातवैधता प्रमाणपत्र अर्ज करण्याच्या वेळी नसल्यास, उमेदवाराची निवड झाल्यास नेमणूकीच्या दिनांकापासून ०६ महिन्यांत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.अन्यथा परिपत्रक क्र.एमबीसी/७१०० दि. ३१.०१.२०१२ व क्र.एमबीसी/४९८५ दि. ०२.०५.२०१७ नुसार कारवाई करण्यात येईल. तसेच नियुक्ती नंतर एक महिन्यात सदर कर्मचा-याने संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जातीचा दावा दाखल करुन त्याबाबतची पोचपावती नियुक्ती प्राधिका-यांना सादर करणे बंधनकारक असेल.

९. महिलांसाठी ३०% प्रमाणे आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.८२/०१/मसेआ-२०००/प्रक्र.४१५/का-२ दि.२५.५.२००१ अन्वयेच्या शासन निर्देशानुसार भरण्यात येतील. महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे पुरुष उमेदवांरामधून भरण्यात येतील. विवाहीत महिला

उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहपूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

१०.अ) आर्थिक दृष्टया दुर्बल घटकासाठी (ईडब्ल्यूएस)१०% प्रमाणे आरक्षित पदे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. राआधो/४०१९/प्र.क्र. ३१/१६ –अ दि. १२.०२.२०१९ व सम क्रमांकाचा शासन निर्णय दिनांक ३१.५.२०२१ मधील निर्देशानुसार आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक रिक्त पदे भरण्यात येतील. तसेच सदर शासन निर्णय अणि शासन परिपत्रक क्र. राआधो२०२३/प्र.क्र.४०/१६- अ दि. २३.३.२०२३ मधील निर्देशांनुसार विहीत करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. आर्थिक दृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी तहसिलदार यांनी वितरीत केलेले व राज्यशासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशाकरिता राज्य शासनाचा प्रमाणपत्राचा नमुना वापरणे आवश्यक आहे. केंद्रीय सेवांचा लाभ घेण्यासाठीचे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र राज्य शासकीय सेवांसाठीच्या पद भरतीकरीता वापरता येणार नाही.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो/४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि. १२.०२.२०१९ व सम क्रमांकाचा शासन निर्णय दि. ३१.०५.२०२१ मधील निर्देशानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल घटक उमेदवारांनी आरक्षणाचा अनुज्ञेयतेसाठी आवश्यक सर्वबाबी पूर्ण करणे आवश्यक आहे.

(विहीत करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, लगतचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, इतर कागदपत्रे इ. )

१०.ब) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग (SEBC) करीता १०% प्रमाणे आरक्षित पदे सन-२०२४ चा कलम ५(२) मध्ये (SEBC) वर्गाच्या आरक्षणाच्या प्रयोजनासाठी उन्नत व प्रगत नॉन क्रिमीलेअर गटाचे तत्व लागू असेल असे नमूद आहे. याबाबत शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दि. २५ मार्च २०१३ अन्वये विमुक्त जाती, भटक्या जाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट याकरीता नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्रासाठी समग्र सूचना देण्यात आल्या आहेत. शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२४/प्रक्र. ७५ /आरक्षण-५ दि. २८.०६.२०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग प्रवर्गाकरीता जात प्रमाणपत्र व मधील निर्देशांनुसार (सा.शै.मा.व.) अर्ज करणा-या उमेदवारांनी अर्ज करावयाच्या दिनांकापूर्वीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग (SEBC) मागासवर्गीयांकरीता अधिनियम २०२४ राज्यात दि. २६.०२.२०२४ पासून लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमान्वये सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गीय रिक्त पदांच्या १०% आरक्षण विहीत करण्यात आले आहे. सदर अधिनियमास मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.३०/२०२४ सोबत संलग्नित याचिका क्र. ३४६८/२०२४ व इतर आव्हान देण्यात आलेले आहे. प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने दि. १६.०४.२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशांन्वये सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्गाकरीता जाहिरातीमध्ये दर्शविल्यानुसार करण्यात येणारी पदभरती सदर याचिकांतील अंतिम निर्देशांच्या अधीन राहून करण्यात यावी असे निदेश पारित करण्यात आले आहेत.

सन २०२४ चा महाराष्ट्र शासन अधिनियम क्र. १६, दि.२६.०२.२०२४ अन्वये महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय मागासवर्गाची (सा.शै.मा.व.) रिक्त पदे भरण्यात येतील क्र. एमबीसी/५६६५ दि.१६.०८.२०२४ सोबतच्या शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२४/प्रक्र.७५/आरक्षण-५ दि.०५.०७.२०२४ मधील निर्देशांनुसार (सा.शै.मा.व.) अर्ज करणा-या उमेदवारांनी अर्ज करावयाच्या दिनांकापूर्वीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र. एमबीसी/४२ दि.०१.०६.२०२३ सोबतच्या महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. महिला २०२३/ प्र.क्र.१२३/कार्य -२ दि.०४.०५.२०२३ मधील निर्देशानुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरिता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आलेली आहे. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला

आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जासोबत न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी असल्या बाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

१२. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र. एमबीसी/६२५७ दि.२०.०१.२०२० अन्वये अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अथवा वर्ग करण्याची कार्यवाही चालू असलेल्या कर्मचा-यांचे तसेच मुळ नियुक्ती अनुसूचीत जमाती प्रवर्गातून झालेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांनी अद्याप अनुसूचीत जमाती जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यास अथवा मुळ नियुक्ती अनुसूचीत जमाती प्रवर्गातून झाल्यानंतर वि.मा.प्र. प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१३. उमेदवारांनी सर्व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत व कार्यालयाने सांक्षाकीत केलेल्या प्रती (प्रादेशिक परिवहन संस्थेचा 1 वर्षापूर्वीचा जडवाहन चालविण्याचा वैध परवाना, शाळा सोडल्याचा दाखला,गुणपत्रिका, मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र, चौकशी प्रमाणपत्र, सॅप प्रणालीतील चौकशी प्रमाणपत्र, मराठी लिहिता, वाचता, बोलता येते याबाबतचे प्रमाणपत्र, वेतन पावती, म.न.पा.ओळखपत्र, खातेप्रमुखांच्या शिफारशीसह सेवा अभिलेखानुसार पडताळणी केलेले प्रपत्र ब (2 प्रती), गोपनीय अहवाल (मागील 5 वर्षाचे इत्यादी), मुळ नियुक्ती कार्यालयीन आदेश, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाला असल्यास त्याबाबतचे कार्यालयीन आदेश तसेच खात्याचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रमाणित प्रतिलिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच नियुक्तीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक असेल याची नोंद घ्यावी.

१४. सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीच्या वेळी सादर करणे अत्यावश्यक आहे, अन्यथा उमेदवार निवडीकरीता  पात्र समजला जाणार नाही याची नोंद घ्यावी. उमेदवार पडताळणीच्यावेळी  उपस्थित न झाल्यास वाहनचालक पदासाठी इच्छुक नाही असे समजण्यात येईल. सदर प्रकरणी कोणताही पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही  ही जबाबदारी  सर्वस्वी उमेदवाराची असेल याची नोंद घ्यावी.

१५. वाहनचालक या पदावर निवड झाल्यानंतर निवड झालेल्या कर्मचा-याने/उमेदवाराने सदर पदावरून मुळ पदावर येण्याबाबत अर्ज दोन वर्षाच्या आत सादर करणे बंधनकारक असेल. दोन वर्षाच्या कालावधी नंतर त्यांचा मुळ पदावरील धारणाधिकार रद्द होईल.

१६. परिपत्रक क्र. एमपीएम/९५३५ दि. २०.०६.२००१ अनुसार सदर पद भरती प्रक्रीयेअंतर्गत वाहनचालक पदाकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची सामाईक सेवाजेष्ठता यादी तयार करुन तात्पुरती निवड यादी तसेच कागदपत्रांच्या पडताळणी अंती अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी  तयार करण्यात यईल. अंतिम  निवडयादीची विधीग्राहयता दोन वर्षासाठी राहील. त्यानंतर ही निवडयादी व प्रतिक्षा यादी व्यपगत होईल. प्रस्तुत भरती प्रक्रीयेतील रिक्त पदांच्या नियुक्तीकरीता उमेदवार इच्छुक नसल्यास, किंवा काही कारणास्तव पदभार  स्विकारला नाही, किंवा कर्मचा-यांस प्रत्यावर्तित केल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पद भरले गेले नाही तरच प्रतीक्षा यादीतील उमेदवारांचा  विचार करण्यात येईल.

१७. उमेदवारांनी  खात्यामार्फत घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणीस  स्वखर्चाने हजर रहाणे आवश्यक आहे.

१८.वाहनचालक या पदासाठी कागदपत्र पडताळणी व व्यवसाय चाचणीकरीता वेळ व दिनांक उमेदवारास कळविण्यात  येईल.

**सही/-**

**कार्यकारी अभियंता (परिवहन) शहर**

प्रत:

**<u>केवळ बृहन्मुंबई महानगरपलिकेतील सर्व खाते/विभाग कार्यालये</u>**